१५ अ

कार्यासन–आठ
दिनांक २८-११-९७.

महाराष्ट्र राज्य

विधि व न्याय विभाग

( सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८ )

# महाराष्ट्र बोर्स्टल शाळा अधिनियम

( दिनांक २९ जुलै, २०१३ पर्यंत सुधारीत)

( BOMBAY ACT No. XVIII OF 1929 )

# The Maharashtra Borstal Schools Act

( *As modified up to 29th July, 2013* )

✳

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित.
२०१३

[ किंमत : रुपये ]

# महाराष्ट्र बोर्स्टल शाळा अधिनियम

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव . . . . . . . . . . | १ |
| २. | विस्तार व प्रारंभ . . . . . . . . . . | २ |
| ३. | व्याख्या . . . . . . . . . . | २ |
| ४. | बोर्स्टल शाळा स्थापन करणे . . . . . . . . . . | २ |
| ५. | तुरुंगाबाबत अधिनियम, १८९४ व कैद्यांबाबत अधिनियम, १९०० हे प्रयुक्त असणे . . | ३ |
| ६. | बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याबाबतचा आदेश न्यायालय देऊ शकेल . . | ३ |
| ७. | राज्य शासनाचा सूट देण्याचा अधिकार . . . . . . . . | ४ |
| ८. | अटकावून ठेवण्याचा आदेश देण्याचा अधिकार असलेली न्यायालये . . . . | ४ |
| ९. | दंडाधिका-यास या अधिनियमाअन्वये आदेश देण्याचा अधिकार नसेल त्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती. | ४ |
| १०. | कलम ६ खालील अधिकारांच्या मर्यादा . . . . . . . . | ५ |
| ११. | कारांगृहातून बोर्स्टल शाळेत किंवा बोर्स्टल शाळेतून कारागृहात पाठवण . . | ५ |
| १२. | सुधारणा होणे अशक्य असलेल्या व्यक्ती इत्यादींचे स्थानांतरण . . . . | ६ |
| १३. | एखाद्या व्यक्तीस, कोणत्या बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवता येईल ते राज्य शासनाने ठरवावयाचे व ते शासन तिच्या स्थानांतरणाचा आदेशही काढू शकेल. | ७ |
| १३-अ. | अपराध्यास दुस-या राज्यातील बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याविषयी किंवा त्यास तेथे नेण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.<br>इतर राज्यातून पाठवलेले अपराधी प्रांतिक बोर्स्टल शाळेत दाखल करून घेण्याबाबतचा अधिकार. | ८ |
| १३-ब. | अटकावून ठेवलेल्या व्यक्तीस वैद्यकीय उपचारासाठी राज्यातील जिल्हा रूग्णालयात पाठवणे. | ९ |
| १४. | लायसनवर मुक्त करण्याचा अधिकार . . . . . . . . . . | ९ |
| १५. | लायसन निलंबित करणे किंवा रद्द करणे . . . . . . . . | १० |
| १६. | नंतरचे पर्यवेक्षण . . . . . . . . . . . . | १० |
| १७. | अटकावून ठेवण्याचा कालावधी . . . . . . . . | ११ |
| १७-अ. | बोर्स्टल शाळेतून सोडून देणे . . . . . . . . . . | ११ |
| १७-ब. | (वगळण्यात आले) . . . . . . . . . . | ११ |
| १८. | बोर्स्टल शाळेतून किंवा पर्यवेक्षणाखालून पळून गेलेल्या अपराध्यास अटक करणे . . | १२ |
| १९. | नियम . . . . . . . . . . | १२ |
| २०. | अपात्रता काढून टाकणे . . . . . . . . . . | १३ |
| २१. | अपील किंवा फेरतपासणी . . . . . . . . . . | १३ |
| २२. | सन १९२८ चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम क्रमांक नऊ आणि सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक पुधरा यांचे निरसन व व्यावृत्ती. | १४ |

सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८ [१]

# [ महाराष्ट्र बोर्स्टल शाळा अधिनियम ] *

[ २५ नोव्हेंबर, १९२९ ]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम या अन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०.

सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३.

सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८.

सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय ) आदेश, १९५६.

महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय ) आदेश, १९६०.

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ (१-१-१९६१.)

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ (१९-१२-१९७५) †

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ (२२-८-२०१२)

**[२] [ महाराष्ट्र राज्यात ] बोर्स्टल शाळा स्थापन करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** [२] [महाराष्ट्र राज्यात] बोर्स्टल शाळा स्थापन करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे, *** [३] **त्याअर्थी,** आता याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास [४] [ महाराष्ट्र बोर्स्टल शाळा अधिनियम ] असे म्हणावे. **संक्षिप्त नाव.**

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासकीय राजपत्र, १९२९, भाग पाच, पृष्ठ १२९ पहा ; निवड समितीच्या अहवालासाठी १९२९ च्या त्याच राजपत्राचा भाग पाच पृष्ठ १४३ पहा आणि परिषदेतील कार्यवाहीसाठी मुंबई विधानपरिषद चर्चा, १९२९ खंड सव्वीस व सत्ताविस पहा.

[२] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१, कलम ३ व ४ अन्वये, " मुंबई इलाख्यात " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) अन्वये " आणि ज्याअर्थी " या शब्दाने सुरू होणार आणि " पूर्व मंजुरी मिळविण्यात आली आहे त्याअर्थी " या शब्दाने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ च्या अनुसूचिद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

[५] हा अधिनियम, १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी महाराष्ट्र राज्याच्या ज्या भागात तो लागू नव्हता त्या भागाला लागू करण्यात आला, आणि अशा प्रकारे लागू केल्यामुळे त्या भागात तो अंमलात येईल. (१९६० महा. २१ क्रमांक २ पहा).

† अधिनियमाची प्रारंभाची तारीख दर्शविते.

विस्तार व प्रारंभ.

**२.** [1] [ (१) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे. ]

१९६० चा महा. २१.

(२) तो, [2] [ राजपत्रात ] प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे [3] [ [4] [ राज्य ] शासन ] [5] [ याबबातीत ] जी तारीख नेमील त्या तारखेस [6] [ पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात ] अंमलात येईल. [5] [ आणि महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ व हैदराबाद प्रदेशात * मुंबई बोर्स्टल शाळा (व्याप्ति व सुधारणा) अधिनियम, १९६० याच्या प्रारंभानंतर अमंलात येईल.]

व्याख्या.

**३.** विषयात किंवा संदर्भात त्याविरुद्ध काही नसल्यास या अधिनियमात,—

(अ) " बोर्स्टल शाळा " याचा अर्थ ज्या, जागेत अल्पवयीन अपराध्यांना या अधिनियमानुसार अटकावून ठेवण्यात आले असताना जेथे त्यांना औद्योगिक प्रशिक्षण व इतर शिक्षण देण्यात येते व ज्यामुळे ती सुधारतील व गुन्हे करण्यापासून परावृत्त होतील अशा प्रकारच्या शिस्तीच्या व नैतिक वातावरणात ठेवण्यात येते अशी जागा असा होतो ;

(ब) " महानिरीक्षक " याचा अर्थ, कारागृह महानिरीक्षक असा होतो व त्यामध्ये [7] [ महानिरीक्षकाने राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने या अधिनियमाखालील आपल्या कर्तव्यांपैकी सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये ज्याच्याकडे सोपवली असतील असा कारागृह उप महानिरीक्षक ; आणि तसेच ] या अधिनियमान्वये महानिरीक्षकाकडे सोपवलेली सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी [3] [ [4] [ राज्य ] शासनाने ] नेमणूक केलेल्या कोणत्याही अधिका-याचा त्यात समावेश होतो ;

(क) " विहित " म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले.

बोर्स्टल शाळा स्थापन करणे.

**४.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता [3] [ [4] [ राज्य ] शासनास ] एक किंवा अधिक बोर्स्टल शाळा स्थापन करता येतील.

[8] [ (१-अ) प्रत्येक बोर्स्टल शाळेसाठी एक प्राचार्य असेल आणि राज्य शासनास आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व सेवक असतील.]

(२) प्रत्येक बोर्स्टल शाळेसाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने एक निरीक्षण समिती (व्हिजिटिंग कमिटी) नेमण्यात येईल.

---

[1] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ५ (१) अन्वये मूळ पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[2] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे " मुंबई शासकीय राजपत्र " या शब्दाऐवजी " राजपत्र " हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] वरील आदेशाद्वारे " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे " प्रांतिक " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ५ (२) अन्वये " याबाबतीत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ५ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये पोट-कलम (१-अ) समाविष्ट करण्यात आले.

* आता सन २०१२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ च्या अनुसूचिद्वारे अधिनियमाच्या नावात बदल करण्यात आला.

१८९४ चा ९. १९०० चा ३. **५.** हा अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम याअन्वये केलेले कोणतेही फेरफार अनुकूलने व अपवाद यास अधीन राहून [१] तुरुंगाबाबत अधिनियम, १८९४ व [१] कैद्याबाबत अधिनियम, १९०० व त्याअन्वये करण्यात आलेले नियम हे या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या प्रत्येक बोर्स्टल शाळेच्याबाबतीत जणू ती शाळा तुरुंग आहे [२][ तिच्यातील व्यक्ती या कैदी आहेत व प्राचार्य हा अधीक्षक आहे ] असे समजून लागू होतील. तुरुंगाबाबत अधिनियम, १८९४ व कैद्यांबाबत अधिनियम, १९०० हे प्रयुक्त असणे.

१८९८ चा ५. **६.** जेव्हा एखादा अपराधी, ज्या अपराधाबद्दल तो जन्मठेपेच्या किंवा कैदेच्या शिक्षेस पात्र होतो असा अपराध केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असेल किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८*— प्रकरण आठ अन्वये प्रतिभूती देण्यात कसूर केल्याबद्दल कैदेची शिक्षा होण्यास पात्र असेल–मग त्याला पूर्वी दोषी ठरवण्यात आले होते हे सिद्ध करण्यात आलेले असो अगर नसो–आणि न्यायालयास असे दिसून येईल की,– बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याबाबतचा आदेश न्यायालय देऊ शकेल.

१९४८ चा मुंबई ७१. १९२८ चा मध्य प्रांत व व-हाड १०. १९५१ चा हैदराबाद ३२.

(अ) असा अपराधी हा १६ वर्षांहून कमी वयाचा नाही किंवा [३][ मुंबई बाल अधिनियम, १९४८, मध्य प्रांत व व-हाडचा बाल अधिनियम १९२८ किंवा हैदराबाद बाल अधिनियम, १९५१ ] जेथे अंमलात नाहीत त्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा ठिकाणी १५ वर्षांहून कमी वयाचा नसून २१ वर्षांहून अधिक वयाचा नाही आणि,

(ब) त्याची गुन्हे करण्याची सवय किंवा प्रवृत्ती किंवा गुंड प्रवृत्तीच्या लोकांशी त्याचे असलेले संबंध या कारणामुळे त्याची सुधारणा होण्यास विशेष मदत होईल इतक्या मुदतीपर्यंत व तशा शिक्षणासाठी व शिस्तीसाठी त्यास अटकावून ठेवणे इष्ट आहे,

अशा बाबतीत न्यायालयाने याबाबत त्यास अधिकार देण्यात आले असतील तर, त्याला योग्य वाटल्यास जन्मठेपेची किंवा कारावासाची शिक्षा देण्याऐवजी किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८*, कलम १२३ अन्वये स्थानबद्धतेचा आदेश देण्याऐवजी या अधिनियमान्वये केलेल्या नियमास अधीन राहून [४][ तीन ] वर्षांहून कमी नाही किंवा पाच वर्षांहून अधिक नाही अशा न्यायालयास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत उक्त अपराध्यास [५][ या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या बोर्स्टल शाळेत किंवा कलम १३ अ च्या तरतुदींस अधीन राहून [६] * * * भारतातील इतर [७][ राज्यातील ] कोणत्याही बोर्स्टल शाळेत ] अटकावून ठेवण्याबद्दल आदेश देता येईल :

---

[१] केंद्रीय अधिनियम पहा.

[२] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ८ अन्वये " तीत अटकावून ठेवलेले कैदी आहेत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये " मुंबई बाल अधिनियम, १९२४ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम २ अन्वये " दोन " या शब्दाऐवजी " तीन " हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " ब्रिटिश " हा शब्द वगळण्यात आला.

[७] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[८] आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

परंतु, असा आदेश देण्यापूर्वी न्यायालय उक्त अपराध्याचे आई-वडील किंवा पालक यांना याबाबतीत आपली बाजू मांडण्याची संधी दिली पाहिजे आणि उक्त अपराधी सुधारण्यासाठी त्यास [१] [अशा बोर्स्टल शाळेत ] ठेवणे योग्य आहे किंवा कसे यासंबंधी त्याच्याकडे पाठवण्यात आलेला कोणताही अहवाल किंवा निवेदन विचारात घेतले पाहिजे व अशा अपराध्याची वागणूक, आरोग्य विषयक व मानसिक स्थिती व त्या प्रकरणातील इतर गोष्टी अशा आहेत की, उपरोक्त प्रकारच्या शिक्षणामुळे व शिस्तीमुळे अशा अपराध्याचा फायदा होण्याचा संभव आहे याविषयी न्यायालयाची खात्री झालेली असली पाहिजे. १८९८ चा ५.

[३] [राज्य ] शासनाचा सूट देण्याचा अधिकार.

**७.** [२] [ [३] [ राज्य ] शासनास ] या अधिनियमान्वये नियम करून अशा नियमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्तींच्या कोणत्याही एका किंवा अनेक वर्गास बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याविषयी आदेश देऊ नये असा निर्देश देण्याचा अधिकार असेल.

अटकावून ठेवण्याचा आदेश देण्याचा अधिकार असलेली न्यायलये.

**८.** या अधिनियमान्वये न्यायालयास देण्यात आलेले अधिकार हे, उच्च न्यायालय, सत्र न्यायालय, [४] * * * वेतनी इलाख शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्याकडूनच वापरण्यात येतील–मग असे प्रकरण त्यांच्यापुढे प्रारंभी येवो किंवा अपिलात येवो किंवा फेरतपासणीत येवो.

दंडाधिका-यास या अधिनियमान्वये आदेश देण्याचा अधिकार नसेल त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती.

**९.** (१) जेव्हा या अधिनियमान्वये अटकावून ठेवण्याचा आदेश देण्याचे अधिकार नसलेल्या कोणत्याही दंडाधिका-याच्या मते, जो दोषी असल्याचे त्यास आढळून आले असेल असा अपराधी किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता १८९८ * प्रकरण ८ अन्वये जे तारण देण्याविषयी अशा दंडाधिका-याने आदेश दिला असेल ते तारण देण्यात ज्याने कसूर केली असा अपराधी बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्यास योग्य असेल तेव्हा, असा दंडाधिकारी कोणताही आदेश न देता असे मत नमूद करून तो ज्याला दुय्यम असेल त्या यथास्थिति [५] [ प्रथम वर्गाचा दंडाधिका-याकडे ] किंवा मुख्य इलाखा शहर दंडाधिका-याकडे त्याने स्वतः चालविलेल्या कामकाजाचे अभिलेख सादर करील व त्याच्याकडे उक्त अपराध्याला पाठविल.

(२) ज्याच्याकडे ही कार्यवाही सादर करण्यात आली असेल असा [५] [ प्रथम वर्ग दंडाधिकारी ] किंवा मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी या अधिनियमाखाली आदेश देण्यास सक्षम असेल अशा, त्याला दुय्यम असलेल्या दंडाधिका-याकडे किंवा यथास्थिति वेतनी इलाख शहर दंडाधिका-याकडे हे प्रकरण हस्तांतरित करील.

(३) ज्याच्यासमोर कार्यवाही अशा प्रकारे सादर करण्यात आली असेल असा [५] [ प्रथम वर्ग दंडाधिकारी ] किंवा मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा ज्याच्याकडे अशाप्रकारे कार्यवाही हस्तांतरित करण्यात आली असेल असा इतर कोणताही दंडाधिकारी, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे आणखी चौकशी (असल्यास)

[१] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २ (२) अन्वये " बोर्स्टल शााळा " या शब्दा ऐवजी " अशा बोर्स्टल शाळेत " हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे " प्रांतिक " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३, कलम २, अनुसूची भाग ३ अन्वये " जिल्हादंडाधिकारी, उप-विभागीय दंडाधिकारी " हे शब्द वगळण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची भाग ३ अन्वये " जिल्हादंडाधिकारी " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

करील आणि अशा अपराध्याला मुळातच त्याच्यासमोर आणण्यात आले किंवा त्याच्याकडून त्याची न्याय चौकशी करण्यात आली असती तर ज्याप्रमाणे आदेश दिला असता त्याप्रमाणेच अपराध्याला बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याचा आदेश देईल किंवा इतर कोणतीही शिक्षा किंवा आदेश देईल.

१८९८ चा ५. **१०.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* याच्या कलम १०६ किंवा कलम ११८ अन्वये प्रतिभूति देण्याबाबत आदेश देण्यात आले असता अशी प्रतिभूति देण्यात कसूर करण्याबद्दल बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्यात आलेल्या कोणत्याही अपराध्यास अशी प्रतिभूति दिल्यावर किंवा उक्त संहितेच्या कलम १२४ अन्वये आदेश देण्यात आल्यावर सोडून देण्यात येईल. कलम ६ खालील अधिकारांच्या मर्यादा.

१८९८ चा ५. [1][**११.** (१) [2][कोणत्याही कायद्यांन्वये शिक्षा देण्यात आल्यामुळे] जन्मठेपेची किंवा कारावासाची शिक्षा भोगीत असलेली [2][किंवा प्रतिभूति देण्यात कसूप केल्यामूळे फौजदारी प्रक्रिया संहिता १८९८*, कलम १२३ अन्वये दिलेल्या आदेशानुसार शिक्षा भोगत असलेली ] व्यक्ती ही ज्या वयाच्या व्यक्तीला गुन्हे करण्याच्या तिच्या सवयीमुळे किंवा प्रवृत्तीमुळे अथवा गुंड प्रवृत्तीच्या लोकांशी तिच्या असलेल्या संबंधामुळे, बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याबाबतचे आदेश देता येतात, अशा वयोमर्यादेतील असल्यामुळे बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवल्यास तिचे हित होईल अशी महानिरीक्षकाची खात्री असेल तर महानिरीक्षकाला लेखी आदेश काढून अशा व्यक्तीस तुरूंगातून [3][या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या ] बोर्स्टल शाळेत [3][किंवा कलम १३-अ च्या तरतुदींस अधीन राहून [4] * * * भारतातील इतर कोणत्याही [5][राज्यातील बोर्स्टल शाळेत ] पाठविण्याविषयी व अशा व्यक्तीच्या कारावासाच्या शिक्षेच्या कालावधीपैकी शिल्लक असेल त्या कालावधीऐवजी [6][किंवा यथास्थिती, प्रतिभूति देण्यात कसूर केल्याबद्दल ती जी कारावासाची शिक्षा भोगण्यास पात्र असेल अशा कारावासाच्या शिक्षेच्या कालावधीऐवजी ]तीला अशा शाळेत अटकावून ठेवण्याविषयी निदेश देता येतील. असा अवधी तिने अगोदर भोगलेल्या जन्मठेपेच्या किंवा कारावासाच्या शिक्षेचा कालावधी धरून कलम ६ अन्वये ज्या कमाल कालावधीपर्यंत अशा व्यक्तीस अटकावून ठेवण्याचा आदेश न्यायालयास देता आला असता त्या कमाल कालावधीपेक्षा अधिक असणार नाही : कारागृहातून बोर्स्टल शाळेत [7][किंवा बोर्स्टल शाळेतून कारागृहात] पाठवणे.

परंतु, महानिरीक्षक [8][ [9][राज्य ]शासनाची ] पूर्व मंजूरी घेतल्याशिवाय अशा व्यक्तीने भोगलेली कारावासाची व जन्मठेपेची शिक्षा धरून तिला देण्यात आलेल्या कालावधीपेक्षा [10][किंवा यथास्थिति प्रतिभूति देण्यात कसूर केल्यामूळे भोगण्यास पात्र असलेल्या कारावासाच्या शिक्षेच्या कालावधीपेक्षा ] अधिक कालावधीपर्यंत बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याबाबतचा निदेश देणार नाही.

---

[1] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्र. ३, कलम २ अन्वये मूळ कलम ११ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्र. ३९, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्र. २, कलम ३ अन्वये हे शब्द, आकडे व अक्षरे समाविष्ट करण्यात आली.

[4] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " ब्रिटीश " हा शब्द वगळण्यात आला.

[5] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[6] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्र. ३९, कलम २ (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१, कलम १० (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशाअन्वये, " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[9] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[10] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्र. ३९, कलम २ (तीन) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

(२) पोट-कलम (१) अन्वये बोर्स्टल शाळेत पाठवलेली व्यक्ती ही अशा शाळेत पाठवण्यात आल्यावर कलम ६ च्या तरतुदीअन्वये जीस अटकावून ठेवण्याविषयी न्यायालयाने आदेश दिला असेल असा अपराधी आहे असे समजण्यात येईल आणि या अधिनियमाच्या तरतुदी अशा व्यक्तीस त्याप्रमाणे लागू होतील.]

[1][(३) या कलमान्वये बोर्स्टल शाळेत पाठवण्यात आलेली व्यक्ती या शाळेतील प्रशिक्षण घेण्यास अयोग्य आहे असे कोणत्याही वेळी आढळून येईल अशा बाबतीत निरीक्षण समितीच्या शिफारशीवरून, महानिरीक्षकास तिला अटकावून ठेवण्याच्या मुदतींपैकी शिल्लक राहिलेल्या मुदतीचे तो ठरविल अशा कारावासाच्या मुदतीत परिवर्तन करता येईल परंतु अशी मुदत कोणत्याही बाबतीत. [2] [ ज्याच्या परिणामी अशा व्यक्तीला बोर्स्टल शाळेत स्थानांतरित करण्यात आले असेल त्या कारावासाच्या मुदतीतून तोपर्यंत भोगून झालेल्या कारावासाचा कालावधी आणि बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याचा कालावधी यापेक्षा ] अधिक असणार नाही आणि अशा अपराध्यास कारागृहात अटकावून ठेवण्याबाबत अधिपत्र काढता येईल आणि त्यानंतर जणू राज्य शासनाच्या सचिवाच्या सहीने काढलेल्या अधिपत्रान्वये त्या कारागृहात अटकावून ठेवण्याबाबत आदेश देण्यात आला असावा असे समजून कलम १२ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदी अशा अपराध्यास लागू होतील. ]

[3] [ (४) कोणत्याही व्यक्तीला बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्यात आल्यानंतर तिला अटकावून ठेवण्यात येण्यापूर्वी तिच्याकडून करण्यात आलेल्या अपराधाबद्दल ती दोषी असल्याचे आढळून आले असेल आणि पोट-कलम (१) मध्ये नमूद करण्यात आलेली कारावासाची शिक्षा तिला न्यायालयाकडून देण्यात आली असेल तर अशा बाबतीत, महानिरीक्षकास लेखी आदेशाद्वारे अशा कारावासाच्या कालावधीचे बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याच्या कालावधीत परिवर्तन करता येईल आणि या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी अशा व्यक्तीच्या बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याच्या सर्वसाधारण कालावधीखेरीज तिने आधीच भोगलेल्या कारावासाच्या कालावधीसह अशा व्यक्तीस न्यायालयाने कलम ६ अन्वये ज्या जास्तीत जास्त कालावधीसाठी अटकावून ठेवण्याचा आदेश दिला असता त्यापेक्षा अधिक होणार नाही अशा कालावधीसाठी अटकावून ठेवण्याचा निदेश देता येईल.

परंतु, अशा व्यक्तीने आपल्या वयाची २५ वर्षे पूर्ण केल्यानंतर तिला बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्यात येणार नाही. ]

सुधारणा होणे अशक्य असलेल्या व्यक्ती इत्यादींचे स्थानांतरण.

**१२.** (१) [4] [एखाद्या न्यायालयाने ] बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवलेला अपराधी पळून गेला असेल, किंवा तो सुधारणा होण्याजोगा नसल्याचे, किंवा त्याच्यामुळे त्या शाळेतील इतर मुलांवर वाईट प्रभाव पडत असल्याचे [5][किंवा पडण्याची शक्यता असल्याचे ] [6][किंवा तो २० वर्षापेक्षा जास्त वयाचा असल्याचे ] [7][ [8] * * * * * ].

---

[1] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १० (१) अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५७, कलम २ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[4] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ११ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्र. ३९, कलम ३ (एक) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्र. १०, याच्या कलम २ अन्वये " किंवा तो २० वर्षाहून अधिक आहे "हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[7] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्र. ३९, कलम ३ (दोन) अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.

[8] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ११ (२) अन्वये " किंवा कलम १४ अन्वये दिलेले लायसन कलम १५ पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या खंड (२) अन्वये राज्य सरकारने रद्द केलेले असेल तेव्हा " हा मजकूर वगळण्यात आला.

महानिरीक्षकाकडून [1] [ [2] [ राज्य ] शासनाला ] कळवण्यात आले असेल अशा बाबतीत किंवा [2] [ राज्य ] शासनाच्या मते बोर्स्टल शाळेत प्रशिक्षण घेण्यास तो अन्य कारणाने अयोग्य असेल अशा बाबतीत [1] [ [2] [ राज्य ] शासनाला ] त्याच्या अटकेत उर्वरित कालावधीचे [1] [ [2] [ राज्य ] शासन ] निर्धारित करील अशा दोन्हीपैकी कोणत्याही प्रकारच्या कारावासाच्या मुदतीत परिवर्तन करता येईल, मात्र कोणत्याही बाबतीत, ती मुदत पुढील दोन्हीपैकी कमी असलेल्या मुदतीपेक्षा जासत असणार नाही.–

(अ) अटकावून ठेवण्याच्या मुदतीपैकी शिल्लक राहिलेली मुदत, किंवा,

(ब) असा अपराधी जो अपराध केल्याबद्दल दोषी असल्यामुळे किंवा प्रतिभूति देण्यात कसूर केल्यामुळे त्याला बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्यात आला असेल [3] * * * अशा अपराधाबद्दल किंवा कसुरीबद्दल कायद्यानुसार विहित केलेली कारावासाची कमाल मुदत,

(२) अशा अपराध्यास [4] [ [5] [ राज्य ] शासनाच्या ] सचिवाच्या सहीने काढलेल्या अधिपत्रानुसार [6] [ महाराष्ट्र राज्यातील ] कोणत्याही कारागृहात अटकावून ठेवता येईल आणि अशा अधिपत्राची व त्या अपराध्याला देण्यात आलेल्या शिक्षेची अंमलबजावणी, अशा अपराध्याला जणू काही फौजदारी अधिकारिता असणा-या सक्षम न्यायालयाकडून शिक्षा देण्यात आल्याप्रमाणे करण्यात येईल.

एखाद्या व्यक्तीस कोणत्या बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवता येईल ते [5] [ राज्य ] शासनाने ठरवावयाचे व ते शासन तिच्या स्थानांतरणाचा आदेशही काढू शकेल.

**१३.** (१) बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याबाबतचा आदेश देण्यात आलेल्या प्रत्येक अपराध्यास, अशाप्रकारे अटकावून ठेवण्याबाबतचा आदेश देण्यात आलेल्या व्यक्तीचा स्वीकार करण्यासाठी [7] [ [5] [ राज्य ] शासन ] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे किंवा विहित रीतीने नियुक्त करील अशा बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्यात येईल :

---

[1] भारतीय विधि अनुकूल परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ कलम ११ (३) अन्वये " किंवा महानिरीक्षकाकडून त्यास अशा बोर्स्टल शाळेत पाठवण्याऐवजी व अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्यात आला असेल " हा मजकूर वगळण्यात आला.

[4] भारतीय विधि अनुकूल्न परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[6] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई राज्य " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[7] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशाद्वारे, " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु अशा अपराध्याची बोर्स्टल शाळेत ताबडतोब सोय होणे शक्य नसेल तर त्याला बोर्स्टल शाळेत पाठवणे शक्य होईपर्यंत कारागृहाच्या एखाद्या विशेष कक्षात किंवा [१] [ [२] [ राज्य ] शासन ] निदेश देईल अशा इतर योग्य भागात अटकावून ठेवता येईल. अशा रितीने अटकावून ठेवण्यात आल्याचा कालावधी हा त्याला बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याचा कालावधी होता असे समजण्यात येईल.

(२) कोणत्याही अपराध्यास कोणत्याही एका बोर्स्टल शाळेतून काढून [३] [ या अधिनियमाअन्वये स्थापन केलेल्या ] कोणत्याही दुस-या बोर्स्टल शाळेत [३] [ किंवा [४] * * * भारतातील कोणत्याही इतर [५] [ राज्यातील ] [६] * * * बोर्स्टल शाळेत पाठवण्याविषयी आदेश [७] [ महानिरीक्षकास ] देता येईल, परंतु, अशा अपराध्यास बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याचा एकूण कालावधी अशा रीतीने त्याला बोर्स्टल शाळेत पाठवल्यामुळे वाढता कामा नये.

अपराध्यास दुस-या [५] [ राज्यातील ] बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्या-विषयी किंवा त्यास तेथे नेण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

[८] [ **१३-अ.** (१) [४] * * * भारतातील कोणत्याही इतर [५] [ राज्यातील ] [६] * * * बोर्स्टल शाळेच्या प्रभारी अधिका-याची पूर्वसंमती घेतल्या वाचून व उक्त [५] [ राज्याच्या ] [१] [ [२] [ राज्य ] शासनाने ] [९] * * * तेथे अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार किंवा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये अपराध्यास अशा बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याकरिता दाखल करून घेण्यास संमती दिल्याखेरीज किंवा अशारीतीने दाखल करून घेण्याचा अशा [१] [ [२] [ राज्य ] शासनास अधिकार असल्याखेरीज अशा इतर राज्यातील बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याबाबतचा वा स्थानांतरित करण्याबाबतचा किंवा काढून टाकण्याबबातचा आदेश देण्यात येणार नाही.

---

[१] भारतीय विधि अनुकूल परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " ब्रिटिश " हा शब्द वगळण्यात आला.

[५] वरील आदेशान्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] वरील आदेशान्वये " किंवा प्रवेशी राज्यातील " हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ कलम ३ अन्वये " राज्य सरकार " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ५ अन्वये कलम १३ (अ) समाविष्ट करण्यात आले.

[९] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " किंवा उक्त प्रवेशी राज्याच्या शासनाने " हा मजकूर वगळण्यात आला.

(२) या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या बोर्स्टल शाळेच्या प्रभारी अधिका-यास याबाबत केलेल्या नियमास अधीन राहून [२] * * * भारतातील कोणत्याही इतर [१] [ राज्यात ] [३] * * * अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमीतींअन्वये कोणत्याही प्राधिकारणाने कोणत्याही व्यक्तीस अशा बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याविषयी दिलेलला कोणताही आदेश अंमलात आणता येईल. या तरतुदी अन्वये अशा बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवलेली व्यक्ती कलम ६ च्या तरतुदीनुसार ज्यास अटकावून ठेवण्याविषयी आदेश देण्यात आला आहे असा अपराधी आहे असे समजण्यात येईल आणि या अधिनिमाच्या तरतुदी अशा व्यक्तीस त्याप्रमाणे लागू होतील.]

इतर [१] [ राज्यातून ] पाठवलेले अपराधी प्रांतिक बोर्स्टल शाळेत दाखल करून घेण्याबाबतचा अधिकार.

[४] [ **१३-ब.** (१) बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवलेल्या अपराध्यास कोणत्याही प्रकारचा आजार झाला असेल व त्या शाळेत त्याची वैद्यकीयदृष्ट्या योग्य काळजी घेणे किंवा त्याच्यावर वैद्यकीय उपचार करणे शक्य होणार नाही याबाबत महानिरीक्षकाची खात्री झाली असेल तर, महानिरीक्षकास त्याला वैद्यकीय उपचारासाठी [१] [ राज्यातील ] कोणत्याही जिल्हा रुग्णालयात नेण्याची आणि असा वैद्यकीय उपचार केल्यानंतर त्यास परत आणण्याची तरतूद करता येईल.

अटकावून ठेवलेल्या व्यक्तीस वैद्यकीय उपचारासाठी [१] [ राज्यातील ] जिल्हा रुग्णालयात पाठवणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये ज्या कालावधीत अपराधी बोर्स्टल शाळेत अनुपस्थित असेल तो कालावधी अशा शाळेत त्यास अटकावून ठेवण्याची मुदत मोजण्याच्या प्रयोजनासाठी अशा अटकावून ठेवण्याच्या मुदतीचाच भाग आहे असे समजण्यात येईल.]

**१४.** (१) विहित केलेल्या शर्तीस अधीन राहून महानिरीक्षकास निरीक्षण समितीच्या शिफारशीवरून एखाद्या अपराध्यास बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्यापासून ६ महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतर कोणत्याही वेळी असा अपराधी गुन्हे करणार नाही व आपले आयुष्य उपयुक्त कामे करण्यात व उद्योगीपणात घालवील अशी वाजवी संभाव्यता असल्याविषयी महानिरीक्षकाची खात्री झाली तर त्याला त्या अपराध्याला बोर्स्टल शाळेतून मुक्त करता येईल आणि महानिरीक्षक मान्यता देईल व उक्त अपराध्यास ताब्यात घेण्यास तयार असेल अशा–

लायसनवर मुक्त करण्याचा अधिकार.

(अ) [५] [ शासकीय अधिका-याच्या ],

(ब) धर्मनिरपेक्ष संस्थेच्या,

(क) धार्मिक संस्थेच्या, किंवा

(ड) जबादार व्यक्तीच्या

पर्यवेक्षणाखाली व अधिकाराखाली राहण्यासाठी परवानगी देण्यासाठी एक लेखी लायसन विहित नमुन्यात व विहित केलेल्या शर्तीवर त्याला देण्यात येईल.

[६] [ **(१-अ)** महानिरीक्षक, विहित शर्तीस अधीन राहून ज्या अपराध्यास पूर्वी लायसन देण्यात आले होते, परंतु ज्याचे लायसन कलम १५ अन्वये नंतर रद्द करण्यात आले होते अशा अपराध्यास सोडून देऊ शकेल व त्याला नवीन लायसन देईल आणि अशा बाबतीत या अधिनियमाच्या तरतुदी नवीन लायसन जणू पोट-कलम (१) अन्वये देण्यात आले असावे असे समजून लागू होतील.]

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] वरील आदेशान्वये " ब्रिटिश " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील आदेशा अन्वये " किंवा प्रवेशी राज्यातील " हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ६ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[५] विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे " सर्व्हन्ट ऑफ क्राऊन " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ७ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

(२) या कलमाअन्वये देण्यात आलेले लायसन अपराध्यास ज्या मुदतीपर्यंत बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याचा आदेश देण्यात आला असेल ती मुदत संपेपर्यंत, त्यापूर्वी ते रद्द करण्यात आले नसेल तर, अंमलात राहील.

(३) या कलमान्वये देण्यात आलेले लायसन परिणामकारक असताना असा अपराधी ज्या मुदतीत बोर्स्टल शाळेत गैरहजर असेल ती मुदत अशा बोर्स्टल शाळेत त्याला अटकावून ठेवण्याची मुदत मोजण्याच्या प्रयोजनांसाठी असा अटकावून ठेवण्याच्या मुदतीचा भाग आहे असे समजण्यात येईल.

लायसन निलंबित करणे किंवा रद्द करणे.

[१] [ **१५.** (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांना अधीन राहून बोर्स्टल शाळेच्या प्राचार्यास किंवा महानिरीक्षकास कोणत्याही वेळी कलम १४ अन्वये दिलेले लायसन ३ महिन्यापेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीसाठी निलंबित करता येईल किंवा निरीक्षण समितीशी विचारविनिमय करून असे लायसन महानिरीक्षकास रद्द करता येईल. अशा रीतीने लायसन रद्द करण्याच्या प्रयोजनासाठी महानिरीक्षकास किंवा निरीक्षण समितीस त्याला किंवा तिला आवश्यक वाटेल अशी चौकशी परिवीक्षा अधिका-यामार्फत किंवा अन्यप्रकारे करता येईल.

(२) ज्या परिसंस्थेच्या किंवा व्यक्तीच्या पर्यवेक्षणाखाली राहण्याची लायसनद्वारे अपराध्यास परवानगी देण्यात आली असेल अशा परिसंस्थेच्या, संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या पर्यवेक्षणाखालून तो निघून जाईल तर, अशा रीतीने तो ज्या तारखेस निघून गेला असेल त्या तारखेस त्याचे लायसन रद्द करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणतेही लायसन निलंबित करण्यात आले असेल किंवा रद्द करण्यात आले असेल किंवा ते रद्द केले आहे असे मानण्यात येत असेल तर त्याबाबतीत अपराध्याने ताबडतोब बोर्स्टल शाळेत परत गेले पाहिजे आणि तो असे करण्यात कसूर करील तर, कोणत्याही पोलीस अधिका-यास अधिपत्रावाचून त्यास अटक करून त्या शाळेत परत पाठविता येईल.

(४) लायसन निलंबित करण्यात आल्यानंतर किंवा रद्द झाल्यानंतर ज्या तारखेस लायसन निलंबित करण्यात आले असेल किंवा रद्द झाले असेल किंवा ते रद्द करण्यात आले आहे असे समजण्यात आले असेल त्या तारखेपासून सुरु होणारी व ज्या तारखेस अपराधी शाळेत परत आला असेल किंवा त्यास अटक करण्यात आली असेल यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेपर्यंतची मुदत ही, कलम १७ च्या तरतुदीस अधीन राहून, त्यास ज्या मुदतीपर्यंत बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याबाबत आदेश देण्यात आलेला असेल ती मुदत मोजताना वगळण्यात आली पाहिजे.]

नंतरचे पर्यवेक्षण.

**१६.** (१) बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवलेल्या अपराध्याची वर्तणूक [२] [ किंवा प्रगती ] अशी आहे की, अटकावून ठेवण्याची मुदत संपल्यानंतर आणखी काही मुदतीपर्यंत त्याने पर्यवेक्षणाखाली राहणे इष्ट आहे असा अहवाल महानिरीक्षक व निरीक्षण समिती कळवील अशाबाबतीत असा अपराधी अटकेची मुदत संपल्यानंतर एक वर्षाहून अधिक नाही अशा आणखी कालावधीसाठी महानिरीक्षक, या अधिनियमान्वये केलेल्या नियमास अधीन राहून निदेश देईल अशा प्राधिका-याच्या, संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या पर्यवेक्षणाखाली राहील असे निदेश [३] [ [४] [ राज्य ] शासनास ] देता येतील.

---

[१] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १२ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १५ दाखल करण्यात आले.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ९ (१) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[१] [ (२) [२] [ राज्य ] शासनास ] [३] [ महानिरीक्षकाकडून व निरीक्षण समितीकडून किंवा अन्य रीतीने पुढील अहवाल सादर करण्यात आल्यावर आणि आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर [५] [ [२] [ राज्य ] शासनास ] पोटकलम (१) अन्वये पर्यवेक्षणाखाली असलेल्या अपराध्यासंबधी पुढीलप्रमाणे निदेश देता येतील :–

(अ) [२] [ राज्य ] शासनास योग्य वाटेल अशा कालावधीपपर्यंत बोर्स्टल शाळेत अपराध्यास पुन्हा अटकावून ठेवण्यात येईल, अथवा.

(ब) [४] * * * [२] [ राज्य ] शासनाला योग्य वाटेल अशा वर्णनाची व अशा कालावधीची कारावासाची शिक्षा भोगील :

परंतु या कलमान्वये ज्या कालावधीपर्यंत पर्यवेक्षणाखाली ठेवता येईल, अटकावून ठेवता येईल व कारावासात ठेवता येईल तो एकूण कालावधी १ वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(३) या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये अपराध्यास जेव्हा कैदेची शिक्षा भोगण्याबद्दल निदेश देण्यात येईल अशा वेळी त्याला कलम १२ पोटकलम (२) च्या तरतुदी लागू होतील.]

अटकावून ठेवण्याचा कालावधी.

**१७.** कोणत्याही व्यक्तीस [५] [ [२] [ राज्य ] शासनाच्या ] मते ती २३ वर्षे वयाची झाल्यानंतर किंवा एखाद्या विशिष्ट बाबतीत [५] [ [२] [ राज्य ] शासन ] निदेश देईल तर ती २५ वर्षे वयाची झाल्यानंतर बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्यात येणार नाही.

बोर्स्टल शाळेतून सोडून देणे.

[६] [ **१७-अ.** [५] [ [२] [ राज्य ] शासनास ] कोणत्याही वेळी बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीला बिनशर्त किंवा घालण्यात येतील अशा शर्तीवर अशा शाळेतून सोडून देण्याबद्दल आदेश देता येईल.]

**१७-ब.** [ परिवीक्षा वगैरे यावर सोडून दिलेल्या अपराध्याविरुद्ध करण्यात आलेल्या तक्रारीची चौकशी, चौकशी समितीने करणे ] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १४ अन्वये वगळण्यात आले.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९ कलम ९ (दोन) अन्वये पोटकलम दाखल करण्यात आले.

[२] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १३ (१) अन्वये " कलम १७-ब अन्वये चौकशी समितीने त्यास सादर केलेल्या प्रतिवृत्ताचा विचार केल्यानंतर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनिमान्वये कलम १३ (२) अन्वये " अपराध्याची वर्तणूक अशी आहे की ता बोर्स्टल शाळेत अअकावून ठेवला जाण्यास अयोग्य आहे " असे प्रतिवृत्त चौकशी समितीने सादर केल्यास " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम ४ अन्वये कलम १७-अ समाविष्ट करण्यात आले. " प्रांतिक " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

बोर्स्टल शाळेतून किंवा पर्यवेक्षणाखालून पळून गेलेल्या अपराध्यास अटक करणे.

**१८.** जो कोणताही अपराधी या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लघंन करून बोर्स्टल शाळेतून पळून गेला असेल [१] [ किंवा कलम १३-ब अन्वये उपचारासाठी ज्या जिल्हा रुग्णालयात त्यास नेण्यात आले तेथून पळून गेला असेल ] किंवा ज्या कोणत्याही प्राधिका-याच्या, परिसंस्थेच्या, संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या पर्यवेक्षणाखाली राहण्याविषयी त्यास निदेश देण्यात आला असेल किंवा कलम १४ अन्वये दिलेल्या लायसन अन्वये राहण्याची त्याला परवानगी देण्यात आली असेल त्या प्राधिका-याचे, परिसंस्थेचे, संस्थेचे किंवा व्यक्तीचे, पर्यवेक्षण चुकवून पळून गेला असेल [२] [ किंवा ज्याने कलम १७-अ अन्वये घातलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग केला असेल ] अशाबाबतीत कोणताही पोलीस अधिकारी, त्याला अधिपत्रावाचून व फौजदारी न्यायधीशाच्या आदेशवाचून अटक करू शकेल व तसेच अशा अपराध्यास यथास्थिति बोर्स्टल शाळेत [१] [ किंवा जिल्हा रुग्णालयात ] किंवा असा प्राधिकारी, परिसंस्था, किंवा संस्था किंवा व्यक्ती यांच्याकडे परत पाठवण्यात येईल.

नियम.

**१९.** (१) [३] [ [४] [ राज्य ] शासनास ] कोणत्याही बोर्स्टल शाळेचे नियमन व व्यवस्थापन करण्यासाठी व या अधिनियमांच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः व वरील अधिकारांच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, अशा नियमात पुढील गोष्टींसाठी तरतूद करण्यात येईल किंवा त्या ठरवण्यात येतीलः—

(अ) या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या बोर्स्टल शाळेचे नियंत्रण व व्यवस्थापन ;

(ब) अशा शाळांतील अधिका-याची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये ;

(क) निरीक्षण समित्यांची रचना, अधिकार व कर्तव्ये, [५] [ आणि त्याच्या बिनसरकारी सदस्यांना द्यावयाचे भत्ते ] ;

(ड) बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याविषयी आदेश दिलेल्या अपराध्यांचे वर्गीकरण, नियंत्रण, शिस्त, प्रशिक्षण (ट्रेनिंग) शिक्षा व वागणूक, आणि अशा अपराध्यास अशा शाळेत पाठवण्याची व्यवस्था होईपर्यंत त्यास तात्पुरते अटकावून ठेवणे ;

(इ) अशा शाळेत अटकावून ठेवलेल्या अपराध्यांना भेटने, व त्यांच्या बरोबर पत्रव्यवहार करणे, या गोष्टीचे विनियमन ;

(फ) अशा शाळेत अटकावून ठेवलेल्या अपराध्यास कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या वर्गाच्या वस्तू पुरवणे किंवा त्यांनी अशा वस्तू जवळ बाळगणे यासंबंधी नियंत्रण किंवा मनाई ;

(ग) कोणत्याही अपराध्याच्या किंवा अपराध्यांच्या कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या बाबतीत या अधिनियमात ठरवलेल्या मर्यादेच्या आत ज्या कालावधीपर्यंत अशा शाळेत अटकावून ठेवण्याचा आदेश देता येईल तो कालावधी ;

(ह) अशा शाळेत अटकावून ठेवण्याविषयी आदेश देता येणार नाही अशा अपराध्यांची एक किंवा अनेक वर्ग (कोणतेही असल्यास) ;

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ११ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम ५ अन्वये हे शब्द, आकडे व अक्षरे समाविष्ट करण्यात आली.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गन्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७, कलम ४ अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[१][ (हह) अपराध्यांना [२] * * * भारतातील इतर [३] [ राज्यातील ] बोर्स्टल शाळेत नेणे व इतर [३] [ राज्यातून ] पाठवलेल्या अपराध्यास या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या बोर्स्टल शाळेत दाखल करून घेणे व अटकावून ठेवणे ;]

(आय) कलम १४ अन्वये दिलेल्या लायसनचा नमुना व शर्ती ;

(जे) अपराध्यांना अटकावून ठेवण्याची मुदत संपल्यानंतर त्याच्यावरील पर्यवेक्षण ;

(के) सुधारणे अशक्य असलेल्या अपराध्यांना बोर्स्टल शाळेतून कारागृहात पाठवणे ;

[४][ (ल) कलम १७-अ अन्वये ज्या शर्तीनुसार अपराध्यास सोडून देता येईल त्या शर्ती ;]

[५][ (म) गुण देणे, निलंबित करणे, किंवा त्यात सूट देणे व परिणामी बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवण्याची मुदत कमी करणे, पारोलवर सोडणे, किंवा संचित रजा मंजूर करणे आणि ज्या शर्तीवर आणि ज्या प्राधिका-याला अटकावून ठेवण्याची मुदत निलंबित करता येईल किंवा तीत सूट देता येईल आणि अपराध्यास पारोलवर किंवा संचित रजेवर सोडून देता येईल त्या शर्ती व ते प्राधिकारी ठरवणे ].

(३) या कलमान्वये नियम करण्यापूर्वी ते आगाऊ प्रसिद्ध करण्यात येतील. [६][ या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येतील आणि ते, ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील अशा फेरफारांना अधीन असतील.]

**२०.** [७][ [८] [ राज्य ] शासनास ] महानिरीक्षक व निरीक्षक समिती यांच्या शिफारशीवरून किंवा अन्यथा बोर्स्टल शाळेत अटकावून ठेवलेल्या अपराध्यास अशा रीतीने अटकावून ठेवल्यामुळे प्राप्त झालेली कोणतीही अपात्रता काढून टाकता येईल. **अपात्रता काढून टाकणे.**

**१८९८ चा ५.** **२१.** या अधिनियमाचे कलम ६ या अन्वये अटकावून ठेवण्याबद्दल दिलेला हा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ** अन्वये करावयाचे अपील व फेरतपासणी यांच्या प्रयोजनांकरिता त्याच मुदतीची कैदेची शिक्षा आहे असे समजण्यात येईल : **अपिल किंवा फेरतपासणी.**

[९] * * *

---

[१] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ६ अन्वये खंड (हह) समाविष्ट करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " ब्रिटिश " हा शब्द वगळण्यात आला.

[३] वरील आदेशान्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम ६ अन्वये खंड " (ल) " जादा दाखल करण्यात आला.

[५] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १५ (१) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड " (म) " दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १५ (२) अन्वये " असे नियम " या शब्दाने सुरू होणारा व " राज्य सरकारास अधिकार आहे " या शब्दाने संपणा-या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[९] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम १३ अन्वये परंतुक वगळण्यात आले.

** आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २ पहा).

सन १९२८ चा मध्य-प्रांत व व-हाड अधिनियम क्रमांक ९ व सन १९५६ चा हैदराबाद अधिनियम क्रमांक १५ यांचे निरसन व व्यावृत्ती.

[१] [२२. * मुंबई बोर्स्टल शाळा (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६० अंमलात आल्यावर महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागास लागू असलेला मध्यप्रांत व व-हाड बोर्स्टल अधिनियम, १९२८ आणि महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद प्रदेशास लागू असलेला हैदराबादचा बोर्स्टल शाळांबाबत अधिनियम, १९५६ हे निरसित झाले आहेत असे समजण्यात येईल :

१९६९ चा महा. २१. १९२८ चा मध्य-प्रांत व व-हाड चा ९. १९५६ चा १५.

परंतु अशा रीतीने अधिनियम निरसित केल्यामुळे,–

(अ) अशा रीतीने निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्याचा पूर्वीचा अंमल, किंवा

(ब) अशा रितीने निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्यान्वये संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क विशेषाधिकार किंवा पत्करलेले कोणतेही बंधन अथवा जबाबदारी, किंवा

(क) अशा रीतीने निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्यासंबंधात झालेली कोणतीही शास्ती, जप्ती अथवा शिक्षा, किंवा

(ड) वर सांगितलेल्या अशा कोणत्याही हक्काच्या, विशेषाधिकाराच्या बंधनाच्या, जबाबदारीच्या, शास्तीच्या, जप्तीच्या किंवा शिक्षेच्या संबंधातील कोणतीही चौकशी, कायदेशीर कार्यवाही, किंवा उपाययोजना यास बाध येणार नाही आणि जणू मुंबई बोर्स्टल शाळा (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६० हा निरसित करण्यात आलेला कायदा ज्या क्षेत्रात अंमलात असेल त्या क्षेत्रात सुरू झाला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती, किंवा शिक्षा लादता येईल. १९६९ चा महा. २१.

आणखी असे की, मागील परंतुकास अधीन राहून अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा उपाययोजना ही (यात केलेली कोणतीही नेमणूक, अटकावून ठेवण्यासंबंधी दिलेला कोणताही आदेश, काढलेली कोणतीही अधिसूचना, दिलेला कोणताही आदेश अथवा निदेश किंवा केलेला कोणताही नियम किंवा नमुना, दिलेले कोणतेही लायसन किंवा प्रमाणपत्र यांचा समावेश होतो) ती जेथवर या अधिनियमाशी विसंगत नसेल तेथवर या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आली आहे असे समजण्यात आले पाहिजे आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा केलेल्या कोणत्याही उपाययोजनेमुळे रद्द करण्यात आली असेल तर व रद्द करण्यात येईपर्यंत ती त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.]

---

[१] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १६ अन्वये कलम २२ जादा दाखल करण्यात आले.

* आता २०१२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ च्या अनुसूचीद्वारे अधिनियमाच्या नावात बदल कररण्यात आला.

शामुना–एच–१७४१–सभासंमरामुं–१०–२०१३-६०४२ प्रती–पीसी ४*

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे-

* **संचालक**

शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
महाराष्ट्र राज्य
(प्रकाशन शाखा), नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
दूरध्वनी : ३६३१४३३, ३६३१७३३, ३६३१७९९ आणि ३६३१५३७

* **पर्यवेक्षक**

शासकीय ग्रंथगार
(केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)
(फक्त स्थानिक विक्रीकरिता)
युसुफ बिल्डींग, दुसरा मजला, खो. नं. २१,
वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ),
मुंबई ४०० ००१
दूरध्वनी : २०४९५९४.

* **व्यवस्थापक**

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
सुसी सोराबाजी मार्ग,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय आवार, पुणे ४११ ००१
दूरध्वनी : ६६८८५९ / ६६५८०८

* **व्यवस्थापक**

शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
दूरध्वनी : ५२२६१५

* **पर्यवेक्षक**

शासकीय ग्रंथगार,
शहागंज (गांधी चौकाजवळ),
औरंगाबाद ४३१ ००१
दूरध्वनी : २५५२५
आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते